ISSN 2278-8808
SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# नाशिक शहरातील प्राथमिक शाळांमध्ये अध्यापन प्रक्रियेत संगीत, नाटक, नृत्य आणि कला यांची उपयुक्तता

**Asst. Prof. Kirti Dilip Chitte** &
**Dr. Bhushan Vasantrao Kardile. Principal**
*(Pages 86-89)*
*K.K.Wagh College of Education, Nashik Maharashtra, India*
*K.K.Wagh College of Education, Nashik Maharashtra, India*

**SRJIS IMPACT FACTOR SJIF 2015**: 5.401
**Date of Issue Release:** 04/03/2017,
**Volume**: SRJIS, Jan-Feb, 2017, 4/30

***ABSTRACT***

*गांधीजींनी स्वीकारलेल्या शैक्षणिक विचारांमध्ये शिक्षण म्हणजे खऱ्या अर्थाने अनुचिंतन आत्मनिरिक्षण आणि कृती या तीन गोष्टींमध्ये समन्वय साधतांना डोक, हात, हृदय, या तीन घटकांची महत्वपूर्ण भूमिका असते. यादृष्टीने अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य करतांना बालकाचा सर्वांगीण विकास हे प्रमुख उद्दिष्ट असले तरीही हा सर्वांगीण विकास साधतांना बालकाच्या मानसिक, शारीरिक, भावनिक व आणि कारक कौशल्यांचा विकास हा प्रथम साधावा लागतो. मात्र हा विकास साधतांना व्यक्तीभेद या घटकाचा विचार मात्र शिक्षकाला करावाच लागतो. व्यक्तिभेदानुसार प्रत्येक बालकाची गुणवैशिष्ट्ये, बुध्दिमत्ता, अभिरूची ही वेगवेगही असते. या अनुषंगाने आज शिक्षक प्रशिक्षणाच्या अभ्याक्रमामध्ये संगीत, नाटक, आणि नृत्य यासारख्या पाठयक्रमांचा संबंध हा जोडला गेला आहे. कारण आनंददायी शिक्षणातून विद्यार्थ्यांची विचारप्रक्रिया विकसित करणे ती नुसतीच विकसित न करता कौशल्यपूर्ण आणि सृजनशील शिक्षणाकडे आता वाटचाल झाली पाहिजे असे लक्षात येते. म्हणून प्रस्तुत संशोधनात संशोधकांनी इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रश्नावली देऊन सद्यस्थितीत संगीत, नाटक, कला यांचा शिक्षकाने अध्यापनात केलेला उपयोग यांचे सर्वेक्षण करून सद्यस्थिती मांडली आहे. व भावी शिक्षणात संगीत, कला, नाटक, नृत्य यांचा उपयोग करून अध्यापनात नाविण्यता निर्माण होईल. एक नवीन सृजनशील पिढी निर्माण होण्यास मदत होईल असे संशोधकांना वाटते.*

CC BY
*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## १.१ प्रस्तावना

आपल्या भारतीय समाजाचे विविधता हे जसे एक वैशिष्टय आहे तसेच शालेय वर्गातही विविधता असते. फक्त विविधतेचे स्वरूप बदललेले असते. वर्गातील बालके विविध प्रकारचे असतात. संपादणूक पातळी, बुध्दिमत्ता, भाषिक ज्ञान, सामाजिक आंतरक्रियांचे कौशल्य, कारक विकास, व्यक्तिमत्व वैशिष्ट्ये इ.सर्वाबाबतच खूप व्यक्तीभेद बालकात असतात. या व्यक्तीभेदाचा विचार करता प्रत्येक बालकात ज्या सुप्त क्षमता असतात ते ओळखण्याची नवीन संधी आजचे शिक्षण करून देते आहे का? बदललेल्या शिक्षण प्रक्रियेत यासारख्या प्रश्नांचा विचार करणे क्रमप्राप्त वाटते. आजच्या शिक्षकाने अध्यापन करतांना वेगवेगळया कार्यनीतीचा वापर करून अध्यापन करावे हयामध्ये फक्त नवनवीन कार्यनीतीच असाव्यात असे अपेक्षित नाही तर सर्जनशीलता असायला हवी. म्हणून अध्यापन शास्त्रामध्ये आजही अध्यापन हे कला आणि शास्त्र यांचे मिश्रण

आहे यावादात न पडता अध्यापनशास्त्राला कलेचे कोंदण दिले तर अध्यययन–अध्यापन प्रक्रिया ही निश्चितच आनंददायी व शिकण्यास प्रोत्साहीत करणारी ठरू शकते.

**१.२ संशोधनाची गरज व महत्व**

प्रस्तुत संशोधनाची गरज यासाठी वाटते की शिक्षक विद्यार्थ्याचे छंद हे कितपत जाणून घेतात. आणि या छंदाना अनुसरून अध्ययन अध्यापन प्रक्रियेत त्याचा कितपत विचार केला जातो. कारण संगीत, नृत्य, चित्रकला यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा विकास होऊ शकतो. संगीताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या भावनेचा अविष्कार होतो, नृत्याच्या माध्यमातून त्यांच्या कारक कौशल्य आणि शारीरिक हालचालीमुळे शारीरिक विकास घडून येण्यास मदत होते. चित्रकलेच्या माध्यमातून ते स्वतःच्या विचारांचा अविष्कार घडवून आणू शकतात व सृजनशीलता व नवनिर्मिती होऊ शकते. थोडक्यात एका दर्जेदार जीवनाकडे वाटचाल करण्यासाठी बालकाची जीवनकौशल्य विकसित करणे गरजेचे आहे आणि दर्जेदार जीवन जगतांना मूल्येही टिकून राहिली पाहिजे हेच आजच्या काळाच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

**१.३ समस्येचे शीर्षक**

**‘नाशिक शहरातील इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांमध्ये अध्यापन प्रक्रियेत संगीत, नाटक, नृत्य आणि कला यांची उपयुक्तता’**

**१.४ उद्दिष्टे**

१. नाशिक शहरातील इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांचा शोध घेणे.
२. नाशिक शहरातील इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांमधील इयत्ता २ रीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा शोध घेणे.
३. नाशिक शहरातील इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांमधील इयत्ता २ रीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करतांना शिक्षकांनी संगीत, नृत्य, कला यांच्या उपयुक्ततेचा अभ्यास करणे.

**१.५ गृहितके**

१. लहान वयातील बालकांना अध्यापन कातांना शिक्षक संगीत, नृत्य, कला यांचा कार्यनीतींचा उपयोग करतात.
**२.** संगीत, नृत्य, कलेचा उपयोग करून अध्यापन केल्यास बालकाचा सर्वांगीण विकास घडून येण्यास मदत होते.

**१.६ नमूना निवड**

नाशिक शहरातील इंग्रजी माध्यमाच्या ५ प्राथमिक शाळांमधील इयत्ता २ रीच्या वर्गाला अध्यापन करणाऱ्या १० शिक्षकांची नमूना निवड सहेतूक पध्दतीने करण्यात आलेली आहे.

**१.७ मर्यादा**

१. प्रस्तुत संशोधन हे फक्त नाशिक शहरापूरतेच मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधनासाठी इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांचीच निवड करण्यात आली आहे.

३. प्रस्तुत संशोधनासाठी १० शिक्षकांची सहेतूक पध्दतीने नमूना निवड करण्यात आलेली आहे.

४. प्रस्तुत संशोधनात शिक्षकांनी अध्यापनामध्ये संगीत, चित्रकला, नाटक, नृत्य याचा उपयोग करून केलेले अध्यापन यांचा विचार करण्यात आलेले आहे.

**१.८ संशोधन पध्दती**

अ. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी वर्णनात्मक विश्लेषण पध्दती, यातील सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग केला आहे.

ब. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता २ री ला अध्यापन करण्यासाठी उपलब्ध असलेले शिक्षकांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आलेली आहे.

क. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी संकलित आधारसामग्रीच्या विश्लेषणासाठी संख्यात्मक व गुणात्मक पध्दतीचा वापर केलेला आहे.

**१.९ निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनात आलेल्या निरीक्षणांवरून पुढीलप्रमाणे निष्कर्ष दिसून येतात.

१.नाशिक शहरातील इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांमध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना वेगवेगळे छंद असल्याचे दिसून येतात यात प्रामुख्याने रांगोळी काढणे, गाणे ऐकणे, वाचणे, लिहीणे, नाचणे, चित्र काढणे अशा क्रमाने छंद नोंदविल्याचे आढळून येते.

२.नाशिक शहरातील इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांमध्ये सर्वच म्हणजे १००% शाळांमध्ये संगीत, चित्रकला, हस्तकला यावर आधारीत उपक्रम व व्याख्याने राबविली जातात.

३. नाशिक शहरातील इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक विद्यार्थ्यांना रोल प्ले देऊन पाठयांश नाटयरूपाने अध्यापन करण्याचे प्रमाण ७०% आहे. मात्र ३०% शाळेतील शिक्षक हे तासिकेचा वेळ मर्यादित असल्याचे नोंदवितात.

४. नाशिक शहरातील इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक हे अध्यापन करतांना फळयावर चित्र रेखाटण्याचे प्रमाण हे ६०% असल्याचे आढळून येते. तर ३५% शिक्षक हे चित्रकलेची आवड असूनही चित्र काढायला जमत नाही असे सांगतात. तर ०५% शिक्षक हे चित्रकलेची फारशी आवड नाही असे मत नोंदवितात.

५. चित्र रेखाटून शिकविल्याने मुलांचे अवधान केंद्रित होण्यास मदत होते, विद्यार्थ्यांना त्यावर प्रश्न विचारून सक्रिय सहभाग घेता येतो तसेच आकलनात सुलभता येण्यास मदत होते. विद्यार्थ्यांच्या कल्पनेचा अविष्कार होण्यास उपयुक्त तंत्र असल्याचे मत शिक्षकांनी नोंदविले

आहे. विद्यार्थ्यांना आाशय दिर्घकाल स्मरणात राहण्यास मदत होते. असे महत्व शिक्षकांनी कलेविषयी नोंदविल्याचे दिसून येते.

६. शिक्षक हे कवितेला चाल लावून अध्यापन करण्याचे प्रमाण ८०% आहे.

७. १००% शिक्षक हे कवितेला चाल लावून सामूहिक गायन करून घेतात असे मत नोंदवितात.

८. शाळेतील शिक्षकांना संगीत, कला, नृत्य यांचा अध्यापनात परीणामकारकपणे वापर करण्यासाठी शाळा वर्कशॉप्स, प्रशिक्षण, चर्चासत्रे संस्थास्तरावर आयोजित केले जातात.व शिक्षक त्यात सहभागी होतात.

९. कलाशिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या ज्ञानरचनेशी संबंध असल्याविषयी सर्वच शिक्षक सकारात्मक

**१०.** प्रतिसाद देतात. तसेच कलाशिक्षणाचा अध्यापनात वापर करण्याविषयी सरकारने विविध योजना काढून शिक्षकांना प्रोत्साहित करावे कारण आनंददायी वातावरणातून विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन करता येईल, नाविण्यपूर्ण शिक्षणाची सुरूवात होईल. विद्यार्थ्यांना कृतीतुन शिक्षण, अनुभवातून शिक्षण देण्यास मदत होईल, विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग घेण्यास मदत होईल आणि त्यांची निरिक्षण करण्याची क्षमता वाढीस लागेल. अध्ययन- अध्यापन प्रक्रियेचा ताण कमी होवून विद्यार्थ्यास अभिरूची प्राप्त होऊन गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्यास मदत होईल. असे मतही शिक्षकांनी कलाशिक्षणाचे शिक्षणातील महत्व याविषयी नोंदविले.

**१.१० शिफारशी**

१.कलाशिक्षणाद्वारे अध्यापन करण्यासाठी सरकारने काही उपक्रम व्याख्याने आपल्या स्तरावर राबविले पाहिजे.

२.कलाशिक्षणाद्वारे अध्यापन करण्यासाठी सरकारने शैक्षणिक साधने व तंत्रे पूरविली पाहिजे. कारण इग्रजी शाळांमध्ये हे साहित्य मुबलक प्रमाणात उपलब्ध असले तरीही मराठी माध्यमातील शाळांमध्ये ही परिस्थिती आढळून येत नाही.